CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नवराष्ट्र | मुंबई, १० डिसेंबर २०२४

# नवी मुंबईमध्ये लवकरच साकारणार त्रिपुरा भवन

## त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक साहा यांनी घेतला आढावा

नवी मुंबई, (वा.) सिडकोने विविध राज्यांच्या भवनासाठी वाशी परिसरात भूखंड दिले आहेत. विशेष म्हणजे त्या भूखंडावर संबंधित राज्यांनी दिमाखात वास्तू उभारल्या आहेत. यात आणखी एका भवनाची भर पडणार आहे. निसर्गरम्य खारघरमध्ये त्रिपुरा भवन उभारण्यासाठी सिडकोच्या माध्यमातून भूखंड देण्यात आला आहे. त्यामुळे विविध धर्म, पंथीय, १८ पगड जातीला आपल्या कुशीत घेऊन प्रत्येक राज्याला न्याय देणारे शहर अशी नवी मुंबई शहराची ओळख जगाच्या पटलावर झाली आहे.

त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक साहा यांनी गुरुवारी मुंबईत त्रिपुरा भवन बांधण्यासाठी संपादित केलेल्या जमिनीची पाहणी केली. महाराष्ट्राच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी मुंबईला गेले होते. त्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी जमिनीची पाहणी केली आणि त्रिपुरा भवनच्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

### खारघरच्या सेक्टर १६ येथील जमीन संपादित

वाशी खाडीकिनारी मार्गावर सिडकोच्या माध्यमातून विविध राज्यासाठी भवन उभारले आहेत. त्यामुळे बाहेरील राज्यातून वैद्यकीय उपचार, व्यवसाय, शैक्षणिक आणि शहरांना भेटी देण्यासाठी आलेल्या नागरिकांना भवन एक आधारवड ठरले आहे. इतर राज्यांप्रमाणे आता त्रिपुरा राज्यासाठीही सिडकोने भवनासाठी भूखंड दिला आहे. त्रिपुरा सरकारने महाराष्ट्रात त्रिपुराभवन उभारण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार त्यासाठी खारघर येथील टाटा हॉस्पिटलनजीक सेक्टर १६ येथील जमीन संपादित केली आहे. सध्या कोलकात्यात तीन, दिल्लीत दोन आणि गुवाहाटीमध्ये एक आणि चेन्नईत त्रिपुराभवन आहे.

### त्रिपुरा सरकारचे १०० कोटी

लोकांची, विशेषत: रुग्णांची गरज लक्षात घेऊन भवन उभारण्याचा त्रिपुरा सरकारने निर्णय घेतला. त्यासाठी १०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्रिपुराचे मुख्यमंत्री साहा यांनी गुरुवारी (ता.७) त्रिपुरा आणि राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांसमवेत जमिनीची पाहणी करीत भवनाच्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

मंगळवार, १० डिसेंबर २०२४ लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM | महामुंबई

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या नोंदणीसाठी पनवेलमध्ये गर्दी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पनवेल :** सिडको महामंडळाच्या २६ हजार घरांच्या सोडत प्रक्रियेत अर्ज नोंदणीसाठी अवघे दोन दिवस शिल्लक आहेत. यात प्रधानमंत्री आवास योजनेतील अडीच लाख रुपयांचे अनुदान मिळावे यासाठी पनवेल महापालिका क्षेत्रातील बेघरांनी या योजनेच्या नावनोंदणीसाठी सोमवारी पालिकेच्या कार्यालयात रांग लावून नावनोंदणी केली. आतापर्यंत पनवेल महापालिकेत २४ हजारांहून अधिक बेघरांनी प्रधानमंत्री आवास योजनेत नाव नोंदविले आहे.

सिडको मंडळाने दसऱ्याच्या मुहूर्तावर 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या योजनेतून वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाकरिता २६ हजार घरांच्या सोडत प्रक्रियेला सुरुवात केली. या सोडत प्रक्रियेमध्ये अर्जदार त्यांच्या पसंतीची सदनिका (घर) निवडू शकतील, हे या योजनेचे वैशिष्ट्य आहे.

११ नोव्हेंबरला सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी या योजनेच्या अर्जदारांसाठी महिन्याभराची मुदतवाढ दिल्यान (पान ३ वर)



## ३० डिसेंबरपर्यंत सोडत प्रक्रियेला मुदतवाढीची मागणी

आर्थिक दुर्बल उत्पन्न गटातील अर्जदारांना प्रधानमंत्री आवास योजनेतून अडीच लाखांचे अनुदान मिळविण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेत नावनोंदणी असण्याची अट आहे. तसेच या सोडतीमध्ये अर्ज नोंदणी करतानाच उत्पन्न प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य आहे. त्यामुळे २६ हजार घरांच्या सोडत प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी अर्जदारांना ही दोन कागदपत्रे महत्त्वाची आहेत. सरकारी कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांनी अजून ३० डिसेंबरपर्यंत सिडकोच्या अर्ज नोंदणीसाठी मुदतवाढीची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या नोंदणीसाठी पनवेलमध्ये गर्दी

(पान १ वरून) ११ डिसेंबर ही अर्ज नोंदणी करण्यासाठीची शेवटची तारीख आहे. अवघे दोन दिवस शिल्लक राहिल्याने ज्यांचे हक्काचे घर नाही अशा नागरिकांनी पनवेल महापालिका क्षेत्रात घर नसल्याने शनिवार व रविवारच्या सुट्टीनंतर सोमवारी पनवेल पालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या कार्यालयाबाहेर अर्ज नोंदणीसाठी गर्दी केली होती.

महापालिकेकडे सोमवारी दुपारपर्यंत २४ हजारांहून अधिक अर्ज बेघरांचे जमा झाल्याची नोंद झाली आहे. पनवेलमधील बेघरांची संख्या ३० हजारांपर्यंत जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या योजनेत घरासाठी इच्छुक नागरिक सिडको मंडळाच्या https:/. cidcohomes. com या संकेतस्थळावर अर्ज करण्यासाठी भेट देऊ शकतील.